...नागरिक करण्याची मागणी करत अनधिकृत बांधकामे तोडण्याची केलेला मागणी केली.

## आधारकार्ड लिंक करण्यास मुदतवाढ

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)** :सरकारी योजनांचे लाभ आणि अनुदान यासाठी आधार कार्ड लिंक करण्याची अंतिम मुदत वाढवण्यात आली आहे. ही मुदत केंद्र सरकारने येत्या ३१ मार्च २०१८ पर्यंत वाढविली आहे. आधी ही मुदत ३१ डिसेंबर २०१७ होती. केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला ही माहिती दिली आहे.

एकूण १३५ सरकारी योजनांसाठी आधार सक्तीचे आहे. गरीब महिलांना मोफत स्वयंपाकाचा गॅस, रॉकेल आणि खतांवरील सबसिडी, सार्वजनिक वितरणप्रणालीमार्फत चालविण्या येणारी स्वस्त धान्य दुकाने, मनरेगा आदी योजनांचा त्यात समावेश आहे. या सर्व योजनांना आधार बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या व्यक्तीजवळ आधार कार्ड नाही त्यांनाही ३१ मार्च २०१८ पर्यंत सरकारी योजनांचा लाभ घेता येईल अशी भूमिका केंद्र सरकारकडून के.के. वेणुगोपालन यांनी सर्वोच्च न्यायालयात मांडली. यापूर्वी बँक खात्याशी आधार लिंक करण्याची अंतिम मुदत वाढवून ३१ डिसेंबर २०१७ करण्यात आली होती. शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी ३१ मार्च २०१८ पर्यंत आधार कार्ड काढणे गरजेचे करण्यात आले आहे.

## मुंबई ते दाभोळ मार्गावर जल वाहतूक सुरू

**दापोली (प्रतिनिधी)** :मुंबई ते दाभोळ या मार्गावर जल वाहतूक सुरू झाली असून सकाळी ११ वाजता मुंबईहून दाभोळला रवाना झालेली बोट आता दिघी बंदरातून दाभोळकडे निघाली आहे. मुंबई - दाभोळ अशी जाणारी रावे नावाची ही बोट ३५ प्रवासी घेऊन आली आहे.

महामार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी व पर्यटकांची गैरसोय दूर करण्यासाठी मेरिटाइम बोर्डाने प्रवासी सेवा सुरू केली असून, या सेवेचा आनंद लुटण्यासाठी हौशी पर्यटकांनी एकच गर्दी केली आहे.

कोकणातील महामार्गावरील वाहतूक कोंडी पर्यटकांची डोकेदुखी बनली असून, महामार्ग अनेक ठिकाणी मृत्यूचा सापळा झाला आहे. या रस्त्यावर दरवर्षी शेकडो निष्पाप लोकांचे प्राण जात आहेत. रस्त्यावरील ताण कमी करून पर्यायी वाहतूक सुरू करण्याच्या दृष्टीने मेरिटाइम बोर्डाने हे ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. या निर्णयामुळे पर्यटकांची गैरसोय दूर होऊन पर्यटनाला मोठी उभारी मिळणार आहे.

दापोलीचे पर्यटन तज्ज्ञ माजी आमदार डॉ. चंद्रकांत मोकल यांनी दाभोळ - धोपावे , तवसाळ - जयगड , वेसवी - बागमंडले , दिघी - आगरदांडा पाच खाड्यांवर फेरीबोट सेवा सुरू केली आहे. त्यामुळे पर्यटनसाठी जोड मिळाली आहे.मुंबई -दाभोळ बोट सेवेचे दिघी बंदर येथे दिघी बंदर अधीक्षक अरविंद सोनवणे, माजी आमदार चंद्रकांत मोकल, डॉ. विद्या मोकल यांनी स्वागत केले.

२) खुला भूखंड (बिनशेती), कुन्नाल टेक्सटाईल पार्क, ए टाईप, प्लॉट क्रमांक १०३ (भाग), सब प्लॉट १५८, १५९, १६०, १६१, १६२, १६३ आणि १६४, सायन शेळपूर रोड, गाव - शेळपूर, तालुका - कामरेज, जिल्हा - सुरत, ७ भूखंड क्षेत्रफळ १२२. २६ चौरस मीटर प्रत्येकी, एकूण क्षेत्रफळ ८५५.८२ चौरस मीटर, मालक श्री बद्रुभभाई डी गढिया.

३) कार्यालय, युनिट क्रमांक ४, पहिला मजला, श्रीजी प्लाझा, को ऑपरेटिव्ह सोसायटी प्रायव्हेट लिमिटेड, झाला रोड क्रमांक १, अंधेरी हाऊस, मुंबई. (बिल्ट अप एरिया २५२ चौरस फूट)

स्थळ : मुंबई
तारीख : २५-१०-२०१७

स्वाक्षरी
प्राधिकृत अधिकारी
स्टेट बँक ऑफ इंडिया

### फॉर्म बी
### जाहीर उद्घोषणा

(इन्सॉल्व्हेन्सी अँन्ड बँकरप्ट्सी (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन १२ अंतर्गत)

**निक्को कॉर्पोरेशन लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | निक्को कॉर्पोरेशन लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोची संस्थापन दिनांक | ३१.०५.१९८३ |
| ३. | प्राधिकारी ज्यांच्याअंतर्गत कॉर्पोरेट व्यक्ती संस्थापित/ नोंदणीकृत आहे | कॉर्पोरेट कामकाज मंत्रालय, आरओसी कोलकाता |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर | U५१०१WB१९८३PLC०३६३६२ |
| ५. कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व प्रधान कार्यालय (काही असल्यास) | | एमसीए नोंदीनुसार नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता : निक्को हाऊस, १ हेरे स्ट्रीट, कोलकाता - ७०० ००१. कामकाज : १. शामनगर, २४ परगणा (उत्तर), पश्चिम बंगाल २. बडीपाडा जिल्हा, मयूरभंज, ओरिसा शाखा कार्यालय - १. ३३-३५, ईडनप्रस्थ, २ रा मजला, एल. बी. एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०० ०८३. |
| ६. | कॉर्पोरेट ऋणकोच्या संदर्भात दिवाळखोरी प्रारंभ दिनांक | दि. १४.०७.२०१० एनसीएलटी कोलकाता खंडपीठ यांचा आदेश दि. १३.०७.२०१७ नुसार. |
| ७. | कॉर्पोरेट ऋणकोच्या दिवाळखोरी प्रारंभाची तारीख | दि. १७.१०.२०१७ (आदेश एनसीएलटी वेबसाइटवर अपलोड करण्यात आला असून परिसमापकाला दि. २३.१०.२०१७ रोजी कळविण्यात आला आहे. |
| ८. परिसमापकाचे नाव, पत्ता, ई-मेल पत्ता व नोंदणीकरण क्र. | | नाव : विनोदकुमार कोठारी, पत्ता : १००६-१००९, कृष्णा बिल्डिंग २२४, ए.जे. सी. बोस रोड, कोलकाता - ७०० ०१७, भारत. Email resolution@vinodkothari.com आयबीबीआय नोंदणीकरण क्र. : IBBI/IPA-००२/आइ - N०००१९/२०१६-२०१७/१००३३ |
| ९. | दावे सादरीकरणाची अंतिम तारीख | दि. २२.११.२०१७, परिसमापन प्रारंभ दिवसापासून ३० दिवस. |

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरणाने दि. १७.१०.२०१७ रोजी निक्को कॉर्पोरेशन लिमिटेडच्या परिसमापनाच्या प्रारंभाचा आदेश दिला आहे जो अपलोड करण्यात आला असून परिसमापकांना दि. २३.१०.२०१७ रोजी कळविण्यात आला आहे.

निक्को कॉर्पोरेशन लिमिटेडच्या भागधारकांना याद्वारे निर्देश देण्यात येत आहे की, त्यांनी दि. २२.११.२०१७ रोजी वा तत्पूर्वीपर्यंत बाब क्र. ८ च्या विरोधात निक्को कॉर्पोरेशन लिमिटेड परिसमापन चिन्हांकित करून वरील विहित ई-मेलवर जे संबंधित असतील त्यानुसार सादर करावेत.

वित्तीय धनकोंनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत. कार्यरत धनको, कामगार व कर्मचाऱ्यांसमवेत, व्यक्तिशः, टपालाद्वारे वा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्यांच्या दाव्यांचे पुरावे सादर करू शकतील.

चुकीचे, दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड होऊ शकेल.

दिनांक : २३.१०.२०१७
ठिकाण : कोलकाता

सही/-
विनोद कुमार कोठारी
(परिसमापक)

धडक इमारत व बांधकाम कामगार संघटना